☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 310 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 13 / 08 / 2025

# 1)खुनाचा प्रयत्न :–

**कंधार :–** सन–2020 ते दि. 11.08.2025 चे दरम्यान, **मौ. बिजेवाडी फिर्यादीचे घरी ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस तिचे सासरचे आरोपी नामे 1. तानाजी बालाजी लुंगारे,(नवरा), 2.राधाबाई बालाजी लुंगारे,(सासु), 3. संभाजी बालाजी लुंगारे,(भाया), 4. शरद बालाजी लुंगारे,(भाया), 5.संतोष बालाजी लुंगारे,(भाया), 6.सुवर्णा दत्ता वरताळे(नंनद), या आरोपीतांनी संगणमत करून तु माहेरहुन मोटार सायकल घेण्यासाठी एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन सतत त्रास देवुन उपाशी पोठी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ करून मारहाण केली तसेच जनावरे बांधण्याचे दोरीने गळफास देवुन खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी महीला, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. बिजेवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 285 / 2025 कलम 109, 85, 3(5), बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि / श्रीमती पिंपरखेडे मॅडम, मो. नं. 7058454820** हे करीत आहेत.

# 2)जबरी चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 12.08.2025 रोजी दुपारी 02.20 वा.चे सुमारास, **स्वराज्य दुध डेअरी ते आशिर्वाद प्लाझा अपार्टमेंन्ट दरम्यान सुमेधनगर पाटीजवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे पाठीमागुन मोटार सायकलवर दोन अनोळखी आरोपीतांनी येवुन संगनमत करून फिर्यादी महिलेचे गळयातील सोन्याचे गंठण 12 ग्रॅम किंमत अंदाजे 65,000 / –रू जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी सौ. निता भ्र. सर्जेराव जाधव, वय 57 वर्षे, व्यवसाय गृहीणी रा. संदीपानी शाळेजवळ चंद्रप्रभा निवास तरोडेकर नगरी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 457 / 2025 कलम 304(2), 3(5), बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री वाडेवाले, मो.नं. 9975745357** हे करीत आहेत.

# 3)गंभीर दुखापत :–

**सिंदखेड :–** दिनांक 11.08.2025 रोजी सकाळी 11.30 वा. चे सुमारास, **मौ. चोरड शिवारातील फिर्यादीचे शेतात ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.विराट विशाल राठोड, 2.विशाल भिका राठोड, 3. संगीता विशाल राठोड, तिघे रा. यशोविहार कॉलनी नांदेड 4. मेथीबाई तारासिंग आडे, रा. टाकळी ता. उमरखेड 5. सखुबाई यमाजी जाधव, रा. रूपलानाईक तांडा ता. माहुर जि. नांदेड यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचा मुलगा व नौकर आपले शेतात फवारणी करीत असतांना फिर्यादीचे मुलास गळयाला व हाताला मारून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी अनिता गंभीर राठोड, वय 58 वर्षे, व्यवसाय शेती व घरकाम रा. पलाईगुडा ता. माहुर जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 123 / 2025 कलम 118(2),189(2),189(4),352,352 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2471 कुमरे,** मो.नं. 7744002471 हे करीत आहेत.

# 4)पळवुन नेले :–

**भाग्यनगर :–दिनांक 12.08.2025 रोजी सायंकाळी 04.15 वा. चे सुमारास, ब्लु बेल्स कॉलेज छत्रपती चौक पुर्णा रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा पाणी पुरी खावुन मित्रासोबत घरी जात असतांना यातील आरोपी नामे 1. शुभम गोपीनाथ वडवळे, वय 20 वर्षे, रा. मोठी कापसी ता. लोहा व इतर तीन विधीसंर्षीत बालक यांनी संगणमत करून फिर्यादीस तु अर्जुनला मदत का करतोस असे म्हणुन फिर्यादीला चापट मारली व त्यास गाडीवर बसवुन पळवुन नेत असतांना हातातील कडयाने फिर्यादीचे डोक्यात मारले व रेल्वे पटरी येथे नेवुन फिर्यादीला हाताने व लाथाबुक्यानी मारहाण करून शिवीगाळ केली. वगैरे **फिर्यादी श्रीजय शिवाजी गायकवाड, वय 16 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. उमा महेश कॉलनी पावडे मंगल कार्यालयाचे पाठीमागे मुळ गाव मांजरम ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं. 458 / 2025 कलम 137(2), 118(1), 115(2), 352 3(5) भा.न्या.सं.–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री देशमुख, मो. नं. 9921533111** हे करीत आहेत.

## 5)जुगार :—

**1)देगलुर :—** दिनांक 12.08.2025 रोजी 18.35 वा. चे सुमारास, **रघुनाथ दादाराव बामणे यांचे घरा शेजारी रोडलगत लिंबाचे झाडाखाली मौ. सुगाव ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. शंकर बाबाराव केरूरे, वय 50 वर्षे, 2. बालाजी विठ्ठलराव गोनेवाड, वय 30 वर्षे, 3. रघुनाथ दादाराव बामणे, वय 60 वर्षे 4. माधव गणपती कुलावाड, वय 56 वर्षे, 5.नरसिंग इंद्रजित जुकरे, वय 60 वर्षे, हे विना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नवाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य 80,000/—रू मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2613 साहेबराव जमनाजी सगरोळीकर, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 418/2025 कलम 12 (अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ/**526 पुरी, मो.क्रं. 9823144893** हे करीत आहेत.

**2)उमरी :—** दिनांक 12.08.2025 रोजी 17.40 वा. चे सुमारास, **मोहन पाटील गोरठा शिवार यांचे शेत शिवारात मौ. गोरठा ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.मारोती गोविंद शिंदे, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. बोळसा 2. धनाजी विश्वांभर वानखेडे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती व मजुरी रा. सावरखेड ता. नायगांव, हे विना परवाना बेकायदेशिररित्या गोलाकार बसुन झन्ना मन्ना नवाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य 1,56,050/—रू मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3027 शेख फिरोज शेख फरीद, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 269/2025 कलम 12 (अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास सपोउपनि/**श्री सुर्यवंशी, मो.क्रं. 9765770159** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबिशन :—

**हिमायतनगर :—** दिनांक 12.08.2025 रोजी 18.30 वा. सुमारास, **जि. प. शाळेसमोर पत्राचे शेडमध्ये मौ. खडकी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.शेख बशीर हुसेन, वय 50 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. खडकी 2. शेख जिलानी शेख बाबु, वय 55 वर्षे, दोघे रा. खडकी ता. हिमायतनगर हे विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 1840/—रू मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेले मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री अमोल हरिदास भगत, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 188/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2966 विजय आऊलवार,** मो.नं. 9763255035 हे करीत आहेत.

## 7)पाण्यात बुडून मृत्यु :—

**मुदखेड :—**दिनांक 11.08.2025 रोजी 14.30 वा. चे सुमारास, भोगळा तलाव क्रमांक 01 मौ. माळकौठा **ता. मुदखेड जि. नांदेड येथे** यातील **मयत नामे गणेश बालाजी शिंदे, वय 20 वर्षे, व्यवसाय शेती रा. काळकौठास ता. मुदखेड जि. नांदेड** हा भोगळा नावाच्या तलावात बैल धुत असतांना पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार बाबाराव निधांनची शिंदे, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. माळकौठा ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे मुदखेड आ. मृ. 30/2025** कलम 194 बीएनएसएस—2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास पोहेकॉ/616 श्री चक्रधर, मो.नं. 7787726868** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड